Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 377 – 381
DOI: 10.5281/zenodo.10129390

Original Research Article

# महात्मा गांधी व असहकार चळवळ

प्रा. डॉ. वसंत निवृत्ती बंडे

विभाग प्रमुख, इतिहास विभाग, सरस्वती संगीत कला महाविद्यालय, लातूर ४१३५१२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: vasantbande@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

मोहनदास करमचंद गांधी हे नाव भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण नाव आहे.त्यांनी सत्य,अहिंसा व सत्यागृह या त्रिसुत्रीचा वापर करून भारताच्या स्वातंत्र्य चळवळीला एक नवीन आयाम दिला. इ. स. १९२० ते इ. स. १९४७ या २७ वर्षामध्ये महात्मा गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व आपल्या खांद्यावर घेऊन ही चळवळ समर्थपणे चालवली व देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. त्यांच्या या कालखंडाला "गांधी युग" असेही म्हणतात. या कालखंडात महात्मा गांधीजींनी ब्रिटिशांच्या विरोधात अनेक चळवळी उभ्या केल्या. असहकार, सविनय कायदेभंग,चलेजाव यासारख्या चळवळी त्यांनी पूर्णपणे अहिंसेच्या व सत्यागृहाच्या माध्यमातून सर्व थरातील जनतेला सोबत घेऊन लढल्या व ब्रिटिश शासनाला दखल घ्यायला भाग पडल्या. त्यांच्या कार्यामुळे ते जागतिक दर्जाचे नेते बनले. त्यांनी लोकामध्ये राष्ट्रीयत्वाची भावना जागृत करून जातीयता,अस्पृश्यता नष्ट करण्याचाही प्रयत्न केला. त्याचबरोबर स्वच्छतेचे महत्त्व ही जनतेला पटवून दिले. त्यांच्या कार्याचा आवाका फार मोठा आहे. त्यांच्या कर्यापैकीच एका कार्यावर म्हणजे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील असहकार चळवळीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या लेखात करण्यात आला आहे.तो पुढील प्रमाणे आहे.

## असहकार आंदोलन म्हणजे काय?

भारतातील ब्रिटिश सत्तेचा अन्याय आणि अत्याचार दिवसेंदिवस वाढत चाललेला होता. भारतीय जनजीवन उधवस्त होत चालले होते.अश्या मुजोर सत्तेला वठणीवर आणण्यासाठी व स्वातंत्र्य मिळवण्यासाठी शांततेच्या व अहिंसक मार्गाने ब्रिटिश सत्तेचा विरोध करण्यासाठी शासनास कोणत्याही प्रकारचे सहकार्य न करण्यासाठी महात्मा गांधीजींच्या

नेतृत्वाखाली जी चळवळ उभी करण्यात आली त्या चळवळीला असहकार चळवळ असे म्हटले जाते. ही चळवळ महात्मा गांधींनी १९२० मध्ये सुरू केली व १९२० मध्ये कांहीं अपरिहार्य कारणामुळे ही चळवळ स्थगित करण्यात आली. ही चळवळ जरी लवकर स्थगित करण्यात आली असली तरी या घटनेमुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या एका नवीन अध्यायाची सुरूवात झाल्याचे दिसून येते. पंजाबमध्ये घडून गेलेल्या जालियनवाला बाग हत्याकांडामुळे भारतीय जनतेच्या मनात ब्रिटिश सतेबद्दल असंतोष निर्माण झाला होता.त्यातूनच असहकार चळवळ सुरू झाली जी नंतर १९२२ च्या चौरी चौरा घटनेमुळे स्थगित करण्यात आली.

**असहकार चळवळ**

महात्मा गांधी हे असहकार चळवळीचे प्रमुख मार्गदर्शक होते. त्यांनी मार्च १९२० मध्ये चळवळीची अहिंसक व असहकार सिद्धांताची रूपरेषा सांगणारा जाहीरनामा प्रकाशित केला. या जाहीरनाम्याच्या माध्यमातून महात्मा गांधींजींनी स्वदेशीची कल्पना भारतीयांच्या मनामध्ये रुजवली. जसे की हातमाग आणि विणकाम स्वीकारून स्वदेशीचा पुरस्कार व विदेशीचा निषेध करण्यासाठी जनतेला प्रोत्साहित करून समाजातून अस्पृश्यता नष्ट करण्याची आशा व्यक्त केली. त्यासाठी महात्मा गांधीजींनी १९२१ मध्ये चळवळीच्या यशस्वितेसाठी व लोकचळवळ बनवण्यासाठी संपूर्ण देशभर दौरा करून जनमत तयार केले.

**असहकार चळवळीची प्रत्यक्ष अंमलबजावणी**

असहकार चळवळीची प्रत्यक्ष अमलबजावनी इ. स. १९२० मध्ये झाली. मूलत: असहकार चळवळ ही ब्रिटिशांच्या भारत सरकारविरुद्ध अहिंसक आंदोलन होती. निषेधाचा एक प्रकार म्हणून, भारतीयांना त्यांच्या पदव्या सोडण्यास आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील त्यांच्या नियुक्त पदांचा राजीनामा देण्यास सांगण्यात आले. लोकांना त्यांच्या सरकारी नोकऱ्या सोडण्यास आणि त्यांच्या मुलांना सरकारी नियंत्रणाखाली असलेल्या किंवा सरकारी निधी प्राप्त झालेल्या शाळेतून काढून घेण्यास सांगण्यात आले. लोकांना विदेशी वस्तू खरेदी करण्यापासून परावृत्त करण्याचे आवाहन करण्यात आले होते. केवळ भारतात तयार केलेल्या उत्पादनांचा वापर करा, विधान परिषदेच्या निवडणुकांवर बहिष्कार घाला आणि ब्रिटिश सैन्यात भरती होण्यापासून दूर राहा असेही बजावण्यात आले होते.वरील उपायांनी अपेक्षित परिणाम न दिसून आल्यास जनतेनी कर भरणे बंद करावे असेही ठरले होते. या वेळी पहिल्यांदाच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने स्वराज्य मिळविन्यासाठी घटनात्मक उपाय सोडून देण्याची तयारी दर्शवली होती. ज्यामुळे असहकार चळवळ स्वातंत्र्य मोहिमेतील एक महत्त्वपूर्ण घटना बनली होती. जर ही मोहीम त्याच्या ध्येयापर्यंत पोहचली तर लवकरच भारताला स्वातंत्र्य मिळू शकते अशी आशा महात्मा गांधींजीना वाटत होती. त्यांनी जनतेला तसे वचनही दिले होते की, स्वराज्य एका वर्षात पूर्ण होईल.

**असहकार चळवळीची कारणे**

पहिल्या महायुद्धात भारतीयांनी जर ब्रिटिशांना मदत केली तर भारतीयांच्या स्वातंत्र्याचा विचार केला जाईल असे आश्वासन ब्रिटिशांनी भारतीयांना दिले होते. आणि त्या अपेक्षेपोटी भारतीयांनी ब्रिटिशांना मदतही केली होती.ब्रिटिशांना केलेल्या भरीव मदतीची भरपाई म्हणून युद्धाच्या शेवटी त्यांना स्वायत्तता मिळेल असा भारतीयांचा विश्वास होता. पण १९१९ चा भारत सरकारचा कायदा अपुरा होता म्हणूनच की काय ब्रिटीशांनी रौलट कायद्यासारखे जाचक कायदे लागू केले तेव्हा युद्धात भारतीयांचा पाठिंबा असूनही ब्रिटिशांनी भारतीयांची दिशाभूल केली, ज्यामुळे ते आणखी संतप्त झाले. ब्रिटिशांच्या विश्वासघातकी धोरणाला विरोध करण्यासाठी व पूर्ण स्वातंत्र्य मिळवण्यासाठी ब्रिटिशांच्या विरोधात महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली असहकार चळवळ सुरू करण्यात आली.

असहकार चळवळीची सुरुवात होमरूल चळवळीपासून झाली, ज्याची स्थापना ॲनी बेझंट आणि बाळ गंगाधर टिळक यांनी केली होती. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे मवाळ आणि जहाल गट एकत्र आले आणि लखनौ कराराने काँग्रेस पक्ष आणि मुस्लिम लीग यांच्यामध्ये एकमत देखील झाले. जहाल गटाच्या पुनरागमनाने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला बळकटी प्राप्त झाली होती. पहिल्या जागतिक महायुद्धाच्या संघर्षात भारताच्या सहभागामुळे लोकांना गंभीर आर्थिक त्रास सहन करावा लागला. वस्तूंच्या किमती वाढू लागल्या, ज्याचा परिणाम सरकारी नोकरावर झाला. शेतमालाच्या स्थिर भावामुळे शेतकऱ्यांचेही हाल झाले. या सर्व प्रकारामुळे सरकारविरोधात नाराजी पसरली. अन्यायी रौलेट कायदा आणि अमृतसर येथे झालेला जालियनवाला बाग हत्याकांडातील  भीषण हत्येचा भारतीय जनतेवर प्रचंड प्रभाव पडला होता. ब्रिटिशांच्या न्याय व्यवस्थेवरील भारतीयांचा विश्वास पूर्णतः उडाला होता म्हणून संपूर्ण जनतेने महात्मा गांधीच्या नेतृत्वाला पाठिंबा दिला कारण त्यांनी सरकारच्या विरोधात अधिक आक्रमक आणि बिनधास्त भूमिका मांडली व ब्रिटिशांविरुद्ध सर्वसमावेशक चळवळ उभी केली.

**असहकार चळवळ का थांबवण्यात आली?**

संपूर्ण भारतभर असहकार चळवळ जोर धरत असतानाच अचानक फेब्रुवारी १९२२ मध्ये चौरी चौरा दुर्घटनेनंतर महात्मा गांधींनी ही चळवळ बंद करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे भारतातील अनेक नेत्यांनी महात्मा गांधीच्या या निर्णयावर नाराजी व्यक्त केली. उत्तर प्रदेशातील चौरी चौरा येथे पोलीस आणि आंदोलनकर्त्यामध्ये झालेल्या चकमकीदरम्यान हिंसक जमावाने पोलीस स्टेशनला आग लावली त्यामुळे या चळवळीला हिंसक वळण लागले जे गांधीजींनी कदापिही मान्य नव्हते. या घटनेत २२ पोलीस अधिकारी ठार झाले. अहिंसेच्या माध्यमातून जनता सरकारचा विरोध करण्यास तयार नाही असे सांगून गांधींनी आंदोलन थांबवले

**चौरी चौरा घटना**

चौरी चौरा ही घटना, भारताच्या इतिहासात अजरामर आहे, ही घटना फेब्रुवारी १९२२ मध्ये ब्रिटीश भारतातील युनायटेड किंगडममधील गोरखपूर जिल्ह्यातील चौरी चौरा येथे घडली. जेव्हा असहकार आंदोलनात सहभागी झालेल्या

आंदोलकांच्या मोठ्या गटाची पोलिसांशी चकमक झाली. प्रत्युत्तरादाखल, आंदोलनकर्त्यांनी पोलिस स्टेशनवर हल्ला केला आणि आग लावली त्यात सर्व कर्मचारी ठार झाले. या घटनेत तीन नागरिक आणि २२ पोलिसांचा मृत्यू झाला. या घटनेचा थेट परिणाम म्हणून हिंसेचे कट्टर विरोधक असलेले महात्मा गांधी यांनी ही चळवळ स्थगित केली. घटनेच्या दोन दिवस आधी, २ फेब्रुवारी १९२२ रोजी, भगवान अहिर नावाच्या ब्रिटीश भारतीय सैन्यातील निवृत्त सैनिकाच्या नेतृत्वाखाली असहकार आंदोलनात सहभागी झालेल्या स्वयंसेवकांनी गौरी बाजारात खाद्यपदार्थांच्या चढ्या किमती आणि मद्यविक्रीला विरोध केला. आंदोलकांना स्थानिक निरीक्षक गुप्तेश्वर सिंह आणि इतर पोलिस अधिकाऱ्यांनी मारहाण केली. अनेक नेत्यांना अटक करून चौरी-चौरा पोलिस स्टेशनच्या लॉकअपमध्ये टाकण्यात आले. प्रत्युत्तर म्हणून, ४ फेब्रुवारी रोजी बाजारपेठेत पोलिसांच्या विरोधात आंदोलन पुकारण्यात आले.

८ फेब्रुवारी रोजी सुमारे २००० ते २५०० आंदोलक एकत्र आले आणि चौरी चौरा मार्केट लेनकडे कूच करू लागले. ते गौरी बाजारातील दारू दुकानावर आंदोलन करण्यासाठी जमले होते. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी सशस्त्र पोलिसांना पाठवण्यात आले होते, तर आंदोलक ब्रिटीशविरोधी घोषणा देत बाजाराकडे कूच करत होते. जमावाला घाबरवण्याचा आणि पांगवण्याच्या प्रयत्नात गुप्तेश्वर सिंगने त्यांच्या १५ स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांना सावध करण्यासाठी हवेत गोळ्या झाडण्याचे आदेश दिले. त्यामुळे संतप्त झालेल्या जमावाने पोलिसांवर दगडफेक सुरू केली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याने उपनिरीक्षक पृथ्वी पाल यांनी पोलिसांना पुढे जाणाऱ्या जमावावर गोळीबार करण्याचे आदेश दिले, त्यात तीन जण ठार झाले आणि अनेक जण जखमी झाले. त्यानंतर झालेल्या गदारोळात मोठ्या संख्येने पोलीस मागे पळून जाऊन पोलीस चौकीच्या आश्रयाला गेले. नंतर संतप्त जमाव पुढे सरसावला. संतप्त झालेल्या जमावाने चौकीला आग लावली. त्यात इन्स्पेक्टर गुप्तेश्वर सिंग यांच्यासह आत अडकलेल्या सर्व पोलिसांचा मृत्यू झाला.

**असहकार चळवळीचे महत्त्व**

महात्मा गांधींनी चळवळ सुरू होण्या अगोदर जनतेला स्वराज्याचे वचन दिले होते. दिलेल्या वचनाप्रमाणे स्वराज्य वर्षभरात प्रत्यक्षात मिळाले नाही. या आंदोलनादरम्यान भारतातील अनेक लोकांनी यात स्वछेने आपला सहभाग नोंदवला व शासनाच्या विरोधात अहिंसक मार्गाने निदर्शने केली. ज्यामुळे ही एक वास्तविक व्यापक चळवळ बनली. चळवळीची व्याप्ती पाहून ब्रिटिश सरकार देखील थक्क झाले, त्यामुळे ते हादरले. या चळवळीत मुस्लिम आणि हिंदूंचा सहभाग होता. हे देशाच्या एकतेचे दर्शन होते. असहकार चळवळीमुळे काँग्रेस पक्षाला जनतेचा पाठिंबा मिळाला. या मोहिमेमुळे लोक त्यांच्या राजकीय हक्कांबाबत अधिक जागरूक झाले. लोकामध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली. त्यांच्या मनात सरकारबद्दल कसलीही भीती राहिली नाही. असंख्य लोक स्वेच्छेने तुरुंगात गेले. या काळात ब्रिटीश मालावर बहिष्कार टाकल्यामुळे भारतीय व्यापारी आणि गिरणीमालकांना भरपूर नफा झाला. खादीला बढती मिळाली. या चळवळीमुळे महात्मा गांधीजींचा लोकप्रिय नेता म्हणून मान्यता मिळाली.

**संदर्भ सूची**

१. डॉ.अनिल कठारे ( संपादक ),आधुनिक भारताचा इतिहास,प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, ५ जून २०१५

२. वि.रा.जोगळेकर (अनुवादक), महात्मा गांधी लुई फिशर जीवन आणि कार्यकाळ, साधना प्रकाशन,पुणे.

३. गो.द.पहिनकर, महात्मा गांधी, साकेत प्रकाशन, छ.संभाजीनगर, ऑक्टोबर २०१९

४. जुगतराम दवे, गांधीजी, नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद.

५. डॉ.अनिल कठारे, डॉ.किशन केंद्रे, हैदराबाद संस्थान आणि महात्मा गांधीजी, पुनम प्रकाशन कंधार